Exh. 4/D

पी.डब्लू.डी.व्ही. अर्ज नं. 106 /२०२६

कोल्हापूर येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो

यांचे न्यायालयात.......

**सपना अरविंद काळूगडे**
व.व.५२, धंदा गृहिणी,
रा.रॉयल हेरीटेज,२०१,असेंब्ली रोड,
बसंत बहार टॉकीज समोर,कोल्हापूर
आधार नं. ५६४८५१८४२६९४
मो नं.९८२२९९७०८०
E mail : kalugadesapan@gmail.com ........ **अर्जदार**

**विरुद्ध**

**अरविंद बाळासाहेब काळूगडे**
व.व. ५४, धंदा : व्यवसाय,
रा. रॉयल हेरीटेज,२०१,असेंब्ली रोड,
बसंत बहार टॉकीज समोर,कोल्हापूर
आधार नं.४८१६३६५९१२१८
मो नं.९८२२२४१४४४ ............ **वि.प.**

Order
--------
Issue Notice to Opponent.

D. B. Gutte,
JMFC, Court No. 7,
Kolhapur
Dt. 22.06.2026

**महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम अर्ज**

**यातील अर्जदार यांचा विनंती अर्ज असा की,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by DNYANESHWAR BHAGWAT GUTTE
Date: 2026.06.22 15:34:51 +0530

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

१) यातील अर्जदार व वि.प हे नात्याने एकमेकांचे पती पत्नी आहेत अर्जदार व वि.प यांचा विवाह दि.२२/०८/१९९३ रोजी हिंदू धर्मशास्त्र रितीरिवाजाप्रमाणे श्री.शाहू वैदिक विद्यालय, बिंदू चौक, कोल्हापूर येथे संपन्न झालेला आहे. सदर विवाह हा प्रेम विवाह आहे.

२) सदर विवाह बंधनातून अर्जदार व वि.प यांना कु.अभिषेक व कुमारी श्वेता असे दोन अपत्ये झालेली आहेत सदर दोन्ही मुले ही सज्ञान आहेत. सदर विवाहानंतर काही दिवस वि.प. हे अर्जादारांशी चांगले वागले.

३) सदर विवाहानंतर थोड्या दिवसातच वि.प. यांना दारू आणि गुटख्याचे व्यसन असलेचे अर्जदार यांचे निदर्शनास आले. त्याबाबत अर्जदार यांनी वि.प. यांना विचारणा केली असता वि.प. यांनी अर्जदार यांना व्यसन बंद करतो असे सांगितले त्यामुळे अर्जदार यांनी वि.प यांचे शब्दांवर विश्वास ठेवला.

४) मात्र वि.प. यांनी अर्जदार यांना सांगून देखील वि.प.यांचा व्यसनाधिनपणा सुरूच राहिला. वि.प.यांचे सततच्या व्यसनामुळे अर्जदार व वि.प.यांना त्यांचे आई वडिलांपासून वेगळे राहावे लागले. त्यावेळी अर्जदार यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आणि व्यवस्थितरित्या वि.प.यांचे सोबत अत्यंत हलाखीच्या परिस्थिती मध्ये देखील अत्यंत चांगला संसार केला. त्यावेळी अर्जदार यांचे घरचे लोकांनी वि.प.यांना समजावून सांगितले त्यावेळी वि.प.यांनी आपले व्यसन सोडले.

५) अर्जदार व वि.प. यांचा संसार पाहून व अर्जदार व वि.प यांना कोणाचाही आधार नसलेमुळे अर्जदार यांचे वडील आणि भाऊ यांनी वि.प. यांना चायनीज हॉटेलचा व्यवसाय काढून दिला. सदर चायनीज हॉटेल व्यवसाय उत्तम पणे चालू झाले नंतर तसेच सदर व्यवसायामधून चांगले

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

उत्पन्न मिळू लागले नंतर वि.प.यांना पुन्हा दारू व गुटख्याचे व्यसन लागले. त्यानंतर वि.प. हे रात्री अपरात्री दारू पिऊन घरात येवू लागले इतकेच नव्हेतर अर्जदार यांनी वि.प. यांना सदर व्यसन बंद करणेबाबत विचारणा केली असता वि.प. यांनी अर्जदार व त्यांची मुलगी श्वेता यांना शिवीगाळ करून मारहाणही करणेस सुरुवात केली. अर्जदार व वि.प हे त्यांच्या आई वडिलांपासून स्वतंत्र राहत असलेमुळे वि.प. यांचे व्यसन यांचे दारूचे व्यसन दिवसेंदिवस वाढू लागले. सदर वि.प. यांचे पुन्हा व्यसनाची तसेच अर्जदार यांना होत असले मारहाणीची बाब अर्जदार यांचे माहेरचे लोकांना समजले नंतर वि.प.यांनी अर्जदार व त्यांचे माहेर कडील लोकांना “आता व्यसन बंद करतो आणि व्यवसाय व कुटुंबाकडे लक्ष देऊन संसार व्यवस्थित करतो.” असे सांगितले अर्जदार आणि त्यांचे माहेर चे लोकांनी वि.प. यांचेवर विश्वास ठेवला.

६) तदनंतर पुन्हा अर्जदार यांनी दोन्ही मुलांच्या भविष्याचा विचार करून व वि.प.यांचेवर असले प्रेमामुळे नव्या उमेदीने संसार करणेस सुरुवात केली. मात्र वि.प नं १ यांनी पुन्हा दारू पिऊन अर्जदार यांना तसेच मुलांना मारहाण करणेस सुरुवात केली. अर्जदार यांनी वि.प.यांना ''तुम्ही असे का वागत आहात ते कृपा करून सांगा'' अशी हात जोडून विनंती केली असता वि.प.यांनी सदर बाब समजून घेणेचे अटीवर अर्जदार यांना, “माझे उपासना असुजा हिचे वर प्रेम आहे ,तू मला आवडत नाहीस, त्यामुळे थोड्या दिवसात आपण घटस्फोट घेऊ” असे वि.प. यांनी अर्जदार यांना सांगितले हे सर्व ऐकून अर्जदार यांना मोठा धक्काच बसला.

तदनंतर अर्जदार यांनी सदरची बाब वि.प यांचे मित्र शैलेश लाटकर यांना सांगितली. त्यावेळी वि.प. यांनी अर्जदार यांना व त्यांचे मित्र शैलेश यांना उपासना फक्त माझी मैत्रीण आहे असे सांगितले. त्यामुळे वि.प यांचे मित्र शैलेश यांनी “अरविंद रागाच्या भरात बोलला असेल, मी त्याला

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

समजावून सांगतो" असे वि.प. यांचे मित्र शैलेश लाटकर यांनी अर्जदार यांना सांगितले.

७) तदनंतर थोडया दिवसांनी वि.प. यांचे मित्र शैलेश लाटकर यांनी वि.प. यांना समजून सांगितले नंतर वि.प. यांनी अर्जदार यांची माफी व झाले गेले विसरून सुखाने संसार करण्याची शपथ दिली. अर्जदार यांनी कुटुंबाचा विचार करून वि.प. यांचे चुकीची वागणूक विसरून सुखाने संसार करण्याचे ठरविले.

८) तदनंतर वि.प. हे पुन्हा थोड्या दिवसांनी जास्त प्रमाणात दारू पिऊन अर्जदार यांना कोणत्याही कारणाशिवाय शिवीगाळ तसेच मारहाण करून त्रास देऊ लागले इतकेच ,नव्हे तर वि.प हे दोन दोन दिवस घरी येत नसत, दारूचे नशेत घरी आले नंतर अर्जदार यांना व त्यांचे माहेरचे लोकांना शिवीगाळ करून अर्जदार यांना मारहाण करत इतकेच .नव्हे तर मुलगी श्वेता समोर देखील अश्लील वर्तन करत या उपरही अर्जदार यांनी वि.प. यांना समजावून सांगणेचा प्रयत्न केला असता वि.प यांनी अर्जदार व वि.प यांचे राहते घर पेटवून तसेच अर्जदार व वि.प राहत असलेल्या रॉयल हेरीटेज या अपार्टमेंट मध्ये घराबाहेरील परिसरात देखील वि.प. यांनी अर्जदार यांना मारहाण केली सदर घटनेबाबत अर्जदार यांनी शाहूपुरी पोलीस ठाणे येथे तक्रार देखील दिली .

त्यांनतर अर्जदार यांनी वि.प. यांना उपासना जासुजा यांचे सोबत त्यांचे हॉटेल मध्ये पाहिले. त्यांनतर अर्जदार यांनी वि.प. उपासना जासुजा यांचे बद्दल माहिती घेतली असता वि.प. हे उपासना जासुजा हिचेसोबत अनैतिक विवाहबाह्य संबंध असलेची खात्री झाली. त्यानंतर अर्जदार यांनी उपासना जासुजा यांचेशी संपर्क करून त्यांना वि.प. यांचेसोबत कोणत्याही प्रकारचा संपर्क करू नका म्हणून विनंती केली असता उपासना जासुजा यांनी अर्जदार यांना "तू माझ्या आणि अरविंद मध्ये येऊ नकोस,अरविंद माझा आहे

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

" असे सांगितले त्यांनतर अर्जदार यांनी उपासना जासुजा यांचे विरुद्ध महिला दक्षता समिती / अधिकारी यांचेकडे तक्रार देखील दाखल केली. तरीही वि.प. उपासना जासुजा यांचे वागणेत कोणताही फरक पडला नाही.

९) गेल्या कित्येक महिन्या पासून वि.प. हे न-सांगता दिवस -दिवसभर कामाचे चे कारण सांगुन घराबाहेर राहत. एकदा अर्जदार यांनी वि.प. वर पाळत ठेवत ते कुठे जातात ते पाहिले असता कामाचे खोटे कारण सांगत वि.प. हे उपासना जासुजा सोबत फिरत असलेले अर्जदारांनी पाहिले.

१०) तदनंतर दुसऱ्या दिवशी अर्जदार यांनी वि.प. यांचा एअरटेल कंपनीचा मोबाईल नंबर ९८२२२४१४४४ हा तपासला असता वि.प. यांना उपासना जासुजा यांनी त्यांच्या मोबाईल नंबर ८३२९८५७३१४ या नंबर वरील केलेले व्हॉटसअॅप चाटिंग पाहिले त्यावेळी वि.प व उपासना जासुजा यांचे अनैतिक विवाहबाह्य संबध असलेचे आणखीन स्पष्ट झाले. वि.प. यांचे सदरचे अनैतिक वर्तन समोर आलेनंतर अर्जदार यांना फार मोठा धक्का बसला. त्यावेळी अर्जदार यांनी वि.प. यांना जाब विचारला असता वि.प. यांनी "मला तुझ्या सोबत संसार करायचा नाही ,तू मला आयुष्यात सुख देऊ शकत नाहीस म्हणूनच मी उपासना कडूनच माझ्या इच्छा पूर्ण करून घेतो " असे अत्यंत धक्कादायक व मन छिन्न करून टाकणारे उत्तर वि.प. यांनी अर्जदार यांना दिले. यातील अर्जदार हे शारीरिक दृष्ट्या सक्षम आहेत. त्यांनी वि.प. यांना वैवाहिक सुख दिले आहे. मात्र वि.प. यांच्या अनैतिक वागण्यामुळे ते अशा प्रकारे बोलत तसेच वागत आहेत. वि.प. यांच्या वागन्याचा अर्जदार यांना प्रचंड मानसिक त्रास झाला. वि.प. यांनी आपले वागण्यामुळे अर्जदारांचे संपूर्ण आयुष्य उध्वस्त करूनच टाकले आहे.

११) सदर बाब सर्व उजेडात आले नंतर वि.प. यांनी "मी आणि उपासना एकत्र राहणार आहे तूला राहायचे असेल तरच इथे राहा नाहीतर घर सोडून जा,

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

पोलिसात गेलीस तर तुला जिवंत सोडणार नाही." अशी अर्जदार यांना धमकी दिली त्यानंतर अर्जदार या दि. ०४/०३/२०२६ रोजी पासून त्याच घरात वेगळे राहत आहेत. वि.प. यांची सदराची कृती ही पूर्णपणे बेकायदेशीर व गुंडगिरीची अशी आहे. आणि त्यामुळे अर्जदार यांना त्यांचे संरक्षण होऊन मिळावे यासाठी सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडत आहे.

१२) यातील वि.प. यांची आपले मूळ गावी वडिलोपार्जित शेती आहे. तसेच वि.प. यांची स्वतःची एक फोर व्हीलर व एक टू व्हीलर आहे. वि.प. वि.प. यांना त्यांचे हॉटेल व्यवसायातून व वैयक्तिक दरमहा दीड ते २ लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. त्यामुळे वि.प. नं. १ यांनी अर्जदार यांना त्यांचे दैनंदिन गरजा, औषधोपचार, न्यायालयीन कामकाजासाठी येणारा खर्च व इतर खर्चासाठी दरमहा रक्कम रुपये ५०,०००/- इतकी पोटगी देणे आवश्यक आहे. तसेच स्वतंत्र निवासासाठी म्हणून दरमहा रक्कम रुपये २०,०००/- इतकी रक्कम देणे आवश्यक आहे.

१३) मुळ अर्जाचे अंतिम सुनावणीस दिनावधी होणार आहे त्यामुळे मुळ अर्जाचे अंतिम निकालापर्यन्त वि. प. विरुद्ध संरक्षणा बाबत, पोटगीबाबत, निवसाचे रककमेबाबत आदेश होऊन मिळणे आवश्यक आहे.

१४) प्रस्तुत अर्ज मंजूर होणे न्यायाचे व समतेचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

१५) अर्जदार यांनी वि.प. यांचे विरुद्ध पिटीशन ए व्यतिरिक्त कोणताही अर्ज इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही.

१६) <u>**सबब अर्जदार यांची मे. कोर्टास नम्र विनंती की,-**</u>

अ) अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

आ) मुळ अर्जाचे अंतिम निकालापर्यंत वि.प. अगर तर्फे इसम यांनी अर्जदार यांना कोणत्याही प्रकारे शारीरिक अगर मानसिक त्रास देऊ नये असा प्रतिबंधात्मक आदेश होऊन मिळावा.

इ) मुळ अर्जाचे अंतिम निकालापर्यंत वि.प. अगर तर्फे इसम यांनी अर्जदार यांचे निवासास कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करू नये व अर्जदार यांना त्रास देऊ नये असा प्रतिबंधात्मक आदेश होऊन मिळावा.

ई) अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचे अंतिम निकालापर्यंत वि.प. यांनी अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ५०,०००/- इतकी पोटगी देणेबाबत आदेश व्हावा.

उ) अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचे अंतिम निकालापर्यंत वि.प. यांनी अर्जदार यांना स्वतंत्र निवासासाठी म्हणून दरमहा रक्कम रुपये २०,०००/- इतकी रक्कम देणेबाबत आदेश व्हावा.

ऊ) कौटुंबिक हिंसाचारापासून अर्जदाराचे संरक्षण होणेबाबतचे अन्य आवश्यक सर्व आदेश करणेत यावेत.

ऋ) जरुर तर अर्ज दुरुस्तीस परवागनी असावी.

ऌ) न्यायाचे इतर हुकुम याच कामी अर्जदार यांचे बाजूने व्हावेत.

येणेप्रमाणे अर्जदार यांचा अर्ज असे.
कोल्हापूर
ता.११/०५/२०२६

**प्रतिज्ञा**

मी यातील अर्जदार सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की उपरोक्त अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा.आज मु.कोल्हापूर
ता.११/०५/२०२६

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

## ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार सपना अरविंद काळूगडे व.व.५२, धंदा–गृहिणी, रा.रॉयल हेरीटेज,२०१,असेंब्ली रोड, बसंत बहार टॉकीज समोर,कोल्हापूर देवाचे शपथेवर कथन करते की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु. कोल्हापूर.

ता. ११/०५/२०२६

Kalugade

## प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की उपरोक्त अर्जातील व त्याखालील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा.आज मु.कोल्हापूर

ता. ११/०५/२०२६

Kalugade

I know the Deponent
Adv. P.M. Chandu

Solemnly Affirmed before me by
Shri Sapna Arvind Kalugade
Age 52 of Assembly road Kolhapur who is
identified by Shri Adv. P.M. Chandu
..............whom I know personally
Dated :- 11/5/26

Assistant Superintendent